महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क.नाविमं / प.उ.मा. / 1472
नागपूर, दि. 13 / 05 / 2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य.
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये
नागपूर विभाग, नागपूर
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

**विषय :– फेब्रुवारी / मार्च 2025 मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक (इ.12वी ) परीक्षेच्या मुळ गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, व इतर साहित्य वाटपाबाबत.**
**संदर्भ :– 1) क्र.रा.मं.परीक्षा–2 / 1675, पुणे, दिनांक 12 / 05 / 2025.**

उपरोक्त विषयानुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत फेब्रु. / मार्च 2025 मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक (इ.12वी) प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ गुणपत्रिका स्थलांतर प्रमाणपत्र व इतर साहित्य यांचे वितरण नेहमीच्या जिल्हा वाटप केंद्रावर **शुक्रवार दिनांक 16 / 05 / 2025 रोजी सकाळी 11:00 वाजता** वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर जिल्हा केंद्रावर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रतिनिधी अधिकार पत्रासह पाठवून स्किारण्याची कार्यवाही करावी.

1. प्रथमतः आपणास प्राप्त झालेल्या सर्व गुणपत्रिका आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करून आपल्या प्रतिनिधी मार्फत त्वरीत या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात **तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील एखादया विद्यार्थ्याची गुणपत्रिका प्राप्त न झाल्यास विनाविलंब मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.**

1. सर्व गुणपत्रिकावर मा. विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर गुणपत्रिकेतील नोंदी उदा. विद्यार्थ्यांचे नांव, नावाचे स्पेलिंग व विषय इत्यादी माहिती कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरून बिनचुक तपासण्यात याव्यात त्यानंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका वितरीत करण्यात याव्यात.
2. गुणपत्रिकेमध्ये काही त्रृटी असल्यास दुरूस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिण्याच्या आत **दिनांक 16 / 06 / 2025** अखेर मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरूस्ती प्रस्तावासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहे.
   अ) प्रति गुणपत्रिकेतील प्रत्येक चुकीच्या दुरूस्तीसाठी रूपये 200 / – आणि नविन गुणपत्रिकेसाठी रूपये 200 / – असे एकुण 400 / – शुल्क भरावे लागेल.
   ब) कनिष्ठ महाविद्यायाच्या जनरल रजिस्टर मधील संबंधित विद्यार्थ्याच्या नावाची नोंद असलेल्या पानाची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकित प्रत सादर करावी.
   क) प्रिलिस्ट व प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर दुरूस्ती का कळविले नाही याबाबत प्राचार्य व लिपीक यांच्या विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा. आपण दिलेला खुलासा हा समाधानकारक असावा.
3. आपल्या कनिष्ठ माहाविद्यालयामार्फत गुणपत्रिका दुरूस्तीच्या परीपुर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरूस्तीची कार्यवाही केली जाईल तद्नंतरच काही त्रृटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

(चितामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रत माहितीस्तव :–**

1) मा. सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.